**Newspaper: Maharashtra Times**

**Article Date: 10th October 2018**

**Article regarding Bhondla-Garba in Podar College**



# कॅम्पसमध्ये 'ए हालो हालो!'

आजपासून सुरू होत असलेल्या नवरात्रोत्सवानिमित्त कॉलेज कॅम्पसमध्येही गरब्याचा मूड ऑन झालाय. कुठे नाइट गरबा, कुठे नून गरबा जोरदार रंगणार असून, त्यासाठी ठेवलेले ड्रेसकोडही चर्चेत आहेत. मुंबई-ठाण्यातल्या कॉलेजांच्या कॅम्पसमध्ये दांडियाच्या 'ए हालो हालो' माहोलवर 'मुंटा'नं टाकलेली एक नजर..

कॉलेजांमध्ये गरबा मूड ऑन

प्रथमेश राणे, कॉलेज क्लब रिपोर्टर
muntainbox@gmail.com

नवरात्रौत्सवात कॉलेजांमध्ये दांडियाचा फिव्हर पाहायला मिळणार नाही असं कसं होऊ शकतं? म्हणूनच मुंबई-ठाण्यातली कॉलेजं आजपासून नऊ दिवस नवरात्रौत्सवाच्या रंगांमध्ये रंगून जाताना दिसणार आहेत. काही निवडक कॉलेजांचा अपवाद वगळता अनेक कॉलेजांमध्ये यंदा गरब्याचं, दांडियाचं आयोजन करण्यात आलं आहे. त्यामुळे परीक्षेच्या काळातही विद्यार्थ्यांचं टेन्शन खल्लास होताना दिसेल. विद्यालंकार, तेरणा अशा विविध कॉलेजांनी यंदा गरब्यासाठी 'ट्रॅडिशनल' थीम ठरवली असून, पारंपरिक पेहरावासह तिथे रास गरबा खेळला जाणार आहे. व्हीजेटीआय कॉलेजनं यंदा नाइट गरब्याचं आयोजन केलं असून, विद्यार्थ्यांना विशिष्ट ड्रेसकोड ठरवून दिला जाणार आहे. त्याचबरोबर अनेक कॉलेजांनी नवरात्रौत्सवाचा सोहळा जरा हटके पद्धतीनं करायचं ठरवलं असून, यामध्ये सोमय्या, विवा तसंच पोदार या कॉलेजांचा समावेश आहे.

**प्रॅक्टिस मेक्स परफेक्ट**

विद्याविहारच्या सोमय्या कॉलेजनं 'प्रॅक्टिस मेक्स परफेक्ट' म्हणत आपल्या विद्यार्थ्यांसाठी 'गरबा प्रॅक्टिस सेशन्स' ठेवली आहेत. नवरात्रीनिमित्त कॉलेजमध्ये रासगरब्याचं आयोजन करण्यात आलंय. गरब्यामध्ये थिरकण्यास इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांचा सकाळच्या सत्रात सराव करून घेतला जातो. यामध्ये नवीन गाण्यांवर गरब्याच्या नव्या स्टेप्स शिकवल्या जाणार आहेत.

**बक्षिसांची खैरात**

विरारच्या विवा कॉलेजमध्ये व्हीएससी म्हणजेच विवा स्टुडंट कौन्सिलनं नाईट गरब्याच्या धर्तीवर विद्यार्थी-शिक्षकांसाठी खास 'नून गरबा'चं आयोजन केलंय. नृत्य नसानसात भिनलेल्या या कॉलेजच्या कॅम्पसमध्ये सर्वोत्तम डान्स स्टेप्स करणाऱ्या विद्यार्थ्यांची निवड करण्यात येऊन त्याला गौरवलं जाणार आहे. त्याचसोबत सर्वोत्तम वेशभूषा आणि सर्वोत्तम जोडी अशा विविध बक्षिसांची खैरात देखील केली जाणार आहे.

**आधी भोंडला, मग गरबा**

माटुंग्याच्या पोदार कॉलेजमध्ये संस्कृती आणि आधुनिकतेचा अनोखा मिलाफ साधला जाणार आहे. आधी महाराष्ट्रीयन भोंडला खेळला जाणार असून, त्यानंतर रास-गरबा खेळला जाणार आहे. त्यामुळे पोदारकरांना कॅम्पसमध्ये पारंपरिक वेशभूषेत हजेरी लावायची आहे. पारंपरिक पेहरावासह भोंडला अन् रासगरबा असा दुहेरी आनंद विद्यार्थ्यांना घेता येणार आहे.